# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

## विद्यापीठ विभागाकरीता

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेबाबत..

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, मागासवर्गीय शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या तथा शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती तथा नवबौध्द घटकांतील इयत्ता ११वी, १२वी तसेच इयत्ता १२वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास वं इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्याकरिता शासनाने दि. ६ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेबाबत परिपत्रक दि. ५/०९/२०१८ अन्वये सर्व संबधितांना कळविण्यात आलेले आहेत.

सदर योजनेसाठी दि. २ नोव्हेंबर, २०१८ पर्यंत अर्ज सादर करण्याबाबत शासनाने सुचना दिल्या आहेत. सदर योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी छापील अर्ज सादर करावयाचे आहेत. सदरील अर्ज या कार्यालयात उपलब्ध असून विद्यार्थ्यांना अर्जाचे वाटप करण्यात आलेले आहेत. अद्यापही ज्या विद्यार्थ्यांनी छापील अर्ज घेतलेले नसतील त्यांनी या कार्यालयातुन त्वरीत अर्ज घेऊन दि. १/११/२०१८ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांसह आपल्या विभागामार्फत शिष्यवृत्ती कक्ष शैक्षणिक प्रवेश विभाग येथे प्रत्यक्ष हस्तपोच सादर करावेत.

सदर परिपत्रक आपल्या विभागातील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे व विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीत या कार्यालयाकडे सादरकरण्याची कार्यवाही व्हावी.

२९/१० २०१८.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/४५६८ }
दिनांक :२९/१०/२०१८ }

प्रत:
मा. विभागप्रमुख/संचालक, विद्यापीठ शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

Desktop/Vidita/MAHADBT AND NSP Scholarship Circular 2017-18